शनिवार, २७ एप्रिल २०१९ ३
सकाळ » TODAY
सकाळ

डी. पी. भोसले कॉलेज ग्रंथालय कोरेगाव

# जनगणनेअभावी भटके विमुक्त उपेक्षित

## डॉ. सुवर्णा रावळ; कोरेगावात डी. पी. भोसले कॉलेजात आंतरराष्ट्रीय परिषद

**कोरेगाव, ता. २६ :** गावगाड्याच्या परिघाबाहेर राहून अत्यंत निकृष्ट, कष्टमय आणि आदिम अवस्थेत भटकंतीचा भोग भोगणाऱ्या भटक्या विमुक्तांची जनगणना होत नसल्यामुळे स्वातंत्र्यानंतर आजही हा समाज उपेक्षितच राहिला आहे, असे मत भटक्या विमुक्त आयोगाच्या अध्यक्षा डॉ. सुवर्णा रावळ यांनी व्यक्त केले.

'भटक्या विमुक्तांची श्रमसंस्कृती, कला व साहित्य आणि वस्तू सेवाकराचा भारतीय अर्थव्यवस्थेवरील परिणाम', या विषयावर येथील डी. पी. भोसले महाविद्यालयात आयोजित केलेल्या आंतरराष्ट्रीय परिषदेत त्या बोलत होत्या. अध्यक्षस्थानी अमेरिकेतील सॅलेसबरी युनिव्हर्सिटीचे डॉ. प्रवीण सप्तर्षी होते. डॉ. रावळ म्हणाल्या, "या देशामध्ये कोणत्याच वर्णात स्थान दिले गेले नसलेल्या अवर्ण जाती, जमाती या भटके विमुक्त आहेत. प्राण्यांची, पक्ष्यांची तसेच वर्ण व्यवस्थेतील अनेक जाती, जमातींची जनगणना केली जाते; परंतु भटक्या विमुक्तांची जनगणना होत नसल्यामुळे आजही हा समाज उपेक्षितच आहे.'' रूमानियातील बुकारेस्ट विद्यापीठातील ॲलिना इस्टॉक म्हणाल्या, "जागतिक स्तरावर अस्तित्व टिकवून असलेली जिप्सी व लिब्रेटेड जाती, जमातींची संस्कृती आदर्शवत आहे. या पार्श्वभूमीवर रूमानिया किंवा भारतातील जिप्सी आणि लिब्रेटेड जाती, जमाती आजही भटकंतीचे जीणे जगत आहेत. त्यांचे अस्तित्व समाजव्यवस्थेने नाकारल्याने त्यांना अनेक समस्यांशी संघर्ष करावा लागत आहे. त्यामुळे आपण सर्वांनीच सामाजिक भान ठेवून या जाती, जमातींना विकासाच्या प्रवाहात आणण्यासाठी प्रयत्नशील राहिले पाहिजे.'' आलुतेदारांच्या बोली व सांकेतिक भाषेबरोबरच त्यांचे समाजजीवन व समस्यांचा अभ्यास संशोधनात्मक पद्धतीने होण्याची आवश्यकता असल्याचे डॉ. सप्तर्षी यांनी यावेळी सांगितले.

परिषदेचे अध्यक्ष व रयत शिक्षण संस्थेचे सहसचिव प्राचार्य डॉ. विजयसिंह सावंत यांनी प्रास्ताविक केले. परिषदेस इटलीच्या मारझिया फेडेरिसी, रूमानियाच्या मारसेला रोटेट्टू, रितु सित्रा, क्लाउंडिया मार्क, लॉरा घेरशेल, रशियाच्या नतालिया कोंडूराके, इंग्लंडमधील लेखक टीम ब्रुस, डॉ. अनुपकुमार रासकर, तिबेट विद्यापीठातील समन्वयक डॉ. संजय कदम उपस्थित होते. डॉ. बाळासाहेब चव्हाण, डॉ. गजानन भोसले, डॉ. भगवान लोकडे यांनी परिषदेमागील भूमिका स्पष्ट केली. डॉ. विद्या नावडकर, प्रा. भीमराव मदने, प्रा. संगीता वीरकर यांनी सूत्रसंचालन केले. डॉ. विजय पाडळकर यांनी आभार मानले.



**कोरेगाव : डी. पी. भोसले महाविद्यालयातील परिषदेच्या उद्घाटनप्रसंगी ॲलिना इस्टॉक, डॉ. सुवर्णा रावळ, डॉ. प्रवीण सप्तर्षी, डॉ. विजयसिंह सावंत आदी.** (शेखर रसाळ : सकाळ छायाचित्रसेवा)